# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

## (स्थानिक गुन्हे शाखा, सातारा)

दुरध्वनी क्रमांक- ०२१६२-२३३९२३ वेबसाईट www.satarapolice.gov.in

मेल आय डी - pilcb.satara@mahapolice.gov.in


**प्रेसनोट** **दिनांक ०९/१२/२०२५**

(स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांची कारवाई.)

**( शिवथर ता.जि.सातारा येथील स्टेट बँक ऑफ इंडियाचे ए.टी.एम मशिन गॅस कटरच्या सहाय्याने कट करुन त्यामधील १२,०६,०००/- रुपये रोख रक्कम चोरणाऱ्या आंतरराज्यीय टोळीस मध्यप्रदेश येथून १२ तासाचे आत स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद. )**

६ डिसेंबर २०२५ रोजी रात्री ०२.०५ ते ०२.२५ वा.चे.दरम्यान मौजे- शिवथर, ता.जि.सातारा येथील स्टेट बँक ऑफ इंडिया च्या ए.टी.एम मधून गॅस कटरचे सहाय्याने फोडून, कापून ए.टी.एम.मशिनचे नुकसान करुन त्यामधील एकूण १२,०६,०००/- रुपये रोख रक्कम कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली तसेच ए.टी.एम.मधील ए.सी कशाने तरी जाळून अंदाजे २०,०००/-रुपये किमतीचे नुकसान केले बाबत दिले मजकुरचे फिर्यादीवरुन सातारा तालूका पोलीस ठाणे गु.र.नं.४४३/२०२५ भा.न्या.सं.क.३०३(२), ३२४(४) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

श्री.तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा व श्रीमती डॉ.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी नमुद गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे त्यांनी घटनास्थळी भेट देवून सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे व रोहित फार्णे तसेच पो.उ.नि. परितोष दातीर यांच्या अधिपत्याखाली ३ वेगवेगळी तपास पथके तयार करुन गुन्हयातील अज्ञात आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले.

सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे व रोहित फार्णे यांच्या तपास पथकाने घटनास्थळावरील व आजूबाजूच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी केली असता त्यामध्ये त्यांना एक संशयीत हुंडाई क्रेटा कार निष्पन्न झाली, तसेच संशयीतांचे सी.सी.टी.व्ही.फुटेज देखील प्राप्त झाले. सदर संशयीत कार तसेच संशयीतांचे सीसीटीव्ही फुटेज याचे आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या तपास पथकाने आपले खाजगी बातमीदारांकडुन माहिती घेवुन सदर एटीएम चोरी करण्या-या टोळयांची माहिती प्राप्त केली असता मेवात राज्य- हरियाना येथे अशाच प्रकारच्या टोळया सक्रिय असल्याची माहिती मिळाली. त्याप्रमाणे मेवात राज्य- हरियाना येथील स्थानिक पोलीसांच्या मदतीने आरोपींची ओळख पटवली असता सदर आरोपी हे मेवात राज्य हरियाना येथील असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. त्याचवेळी घटनास्थळाच्या आजुबाजुच्या परिसरातील व महामार्गावरील सी.सी.टी.व्ही.फुटेजच्या आधारे सदरचे आरोपी हे गुन्हा केल्यानंतर पुणे बाजुकडे गेल्याचे निष्पन्न झाल्याने तसेच ते पुणे औरंगाबाद, धुळे, धार, इंदौर राज्य- मध्य प्रदेश- दिल्ली मार्गे मेवात हरियानाकडे जात असल्याची खात्रीलायक माहिती प्राप्त झाल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने लागलीच त्यांचा पाठलाग सुरु केला परंतु आरोपींची गाडी व स्था.गु.शा. च्या पथकामध्ये जवळपास २०० ते २५० कि.मी.अंतर राहत होते. आरोपींची गाडी साधारण सकाळी १०.०० वाजता धुळे जिल्हा सरहदद पास करुन मध्य प्रदेश राज्यात

गेल्याचे निष्पन्न झाल्याने श्री. तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा यांनी स्वत: पोलीस अधीक्षक धार तसेच पोलीस अधीक्षक इंदौर राज्य मध्यप्रदेश यांना फोनवरुन संपर्क करुन त्यांना संशयीतांचे तसेच त्यांचेकडील वाहनांचे सी.सी.टी.व्ही.फुटेज पाठवले व त्यांना संबंधीत जिल्हयात नाकाबंदी लावुन संशयीतांना ताब्यात घेण्याची विनंती केली. त्याप्रमाणे धार तसेच इंदौर जिल्हयात तात्काळ नाकाबंदी लावण्यात आली होती. सदर नाकाबंदीदरम्यान संशयीत हे पिथमपुर पोलीस ठाणे, जि.धार राज्य- मध्यप्रदेश च्या हददीतुन दिल्लीकडे जात असताना पिथमपुर पोलीस स्टेशनचे अधिकारी व त्यांच्या टीमने सदर संशयीत वाहन तसेच संशयीतांना ताब्यात घेवुन पोलीस अधीक्षक सातारा यांना त्याबाबत माहिती दिली.

दरम्यान पिथमपुर जि.धार राज्य मध्यप्रदेश येथे रवाना झालेले स्थानिक गुन्हे शाखेचे तपास पथक ७०० कि.मी अंतर ७ तासामध्ये पुर्ण करुन तात्काळ पिथमपुर पोलीस ठाणे येथे दाखल झाले. तपास पथकाने ताब्यात घेतलेल्या १) हासमदिन अल्लाबचाए खान, वय ५४ वर्षे, रा.मलार, मलाररोड, मुसलमान पठाण टयुबवेलच्या जवळ, ता.फलोदी जि.जोतपूर, राज्य राजस्थान, २) सलीम मुल्ली इस्ताक, वय २५ वर्षे, रा.दौरखी, ता.फिरोजपूर झिरका, जि.नहुमेवात राज्य हरियाना, ३) राहूल रफिक, वय ३० वर्षे, रा.बाजीदपूर ता.फिरोजपूर झिरका जि.नहुमेवात राज्य हरियाना इसमांचेकडे विचारपूस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे सांगितल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्यांचेकडुन एटीएम मधून चोरी केलेल्या १२,०६,०००/- रुपये रकमेपैकी ११ लाख ९९ हजार रुपये रोख रक्कम, गुन्हयात वापरलेली क्रेटा कार तसेच आरोपींनी एटीएम फोडयासाठी वापरलेले साहित्य असे जप्त केलेले आहे. सदर आरोपी हे हरियाना तसेच राजस्थान येथील अभिलेखावरील गुन्हेगार असुन त्यांच्यावर यापुर्वी गुजरात, आसाम, राजस्थान, कर्नाटक या राज्यात याच प्रकारचे एटीएम चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

श्री.तुषार दोशी पोलीस अधीक्षक सातारा यांचे आदेशान्वये नमुद गुन्हा स्थानिक गुन्हे शाखा, सातारा येथे वर्ग करण्यात आल्याने नमुद तीनही आरोपींची मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सातारा यांचेकडून दि.१०/१२/२०२५ रोजीपर्यंत पोलीस कोठडी घेण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे करीत आहेत.

श्री.तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा व श्रीमती डॉ.वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरुण देवकर, सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे, रोहित फार्णे, पो.उ.नि. विश्वास शिंगाडे, पारितोष दातीर, पोलीस अंमलदार अतिश घाडगे, संतोष सपकाळ, विजय कांबळे, संजय शिर्के, शरद बेबले, लैलेश फडतरे, लक्ष्मण जगधने, प्रविण फडतरे, अमित माने, राकेश खांडके, अरुण पाटील, प्रविण कांबळे, अमित सपकाळ, गणेश कापरे, स्वप्नील कुंभार, अविनाश चव्हाण, ओंकार यादव, स्वप्निल शिंदे, मोहन पवार, रोहित निकम, पृथ्वीराज जाधव, विशाल पवार, सचिन ससाणे, प्रविण पवार, रविराज वर्णेकर यांनी सदरीच कारवाई केली असून **स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाचे श्री.तुषार दोशी पोलीस अधीक्षक सातारा व श्रीमती डॉ.वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी अभिनंदन केले आहे.**

---